महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२३/प्र.क्र.०७/२०२३/३१ दिनांक - ०४ ऑक्टोबर, २०२३

## - : प्रसिद्धीपत्रक:-

**विषय** :- लघुलेखक संवर्गांकरीता लघुलेखन-टंकलेखन चाचणीच्या गुणदान पध्दतीबाबत.
**संदर्भ** :- जाहिरात क्रमांक ३९/२०२२, ४०/२०२२, ४१/२०२२, ४२/२०२२, ४३/२०२२ आणि ४४/२०२२.

आयोगाकडून उच्च श्रेणी लघुलेखक (मराठी) व (इंग्रजी), गट-ब (अराजपत्रित), निम्न श्रेणी लघुलेखक (मराठी) व (इंग्रजी), गट-ब (अराजपत्रित) आणि लघुटंकलेखक (मराठी) व (इंग्रजी), गट-क या संवर्गांसाठी सेवाप्रवेश नियम व जाहिरातीतील तरतुदीनुसार ७५ गुणांची संगणक प्रणालीवर आधारित लघुलेखन-टंकलेखन चाचणी आयोजित करण्यात येणार आहे.

**२.** लघुलेखक संवर्गाच्या लघुलेखन-टंकलेखन चाचणीचा आराखडा खालीलप्रमाणे असेल:-

| अ.क्र. | संवर्ग | लघुलेखन स्पिड | शब्दसंख्या | डिक्टेशन कालावधी | टंकलेखन कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | उच्च श्रेणी लघुलेखक | १२० | ३६० | ३ मिनिटे | ४० मिनिटे |
| २ | निम्न श्रेणी लघुलेखक | १०० | ३०० | ३ मिनिटे | ३५ मिनिटे |
| ३ | लघुटंकलेखक | ८० | २४० | ३ मिनिटे | २५ मिनिटे |

**३.** उपरोक्त आराखड्यानुसार प्रस्तुत संवर्गांसाठी श्रुतलेखन व लघुलेखन-टंकलेखन चाचणीचे गुणदान खालीलप्रमाणे असेल:-

(१) लघुलेखन-टंकलेखन चाचणीच्या एकुण ७५ गुणापैकी ७० गुण परिच्छेद टंकलेखनास व ५ गुण संकेताकृतीसाठी (outline) असतील.

(२) परीक्षार्थीने श्रुतलेखन लघुलिपीत घेणे आवश्यक असेल.

(३) शब्द वगळणे, अतिरीक्त शब्द लिहीणे, शुध्दलेखनातील चुका, परिच्छेदाच्या सुरवातीचा टॅब (indent) न देणे इत्यादी व अशा प्रकारच्या प्रत्येक दोन चुकांसाठी एकुण ७० गुणांमधून एक गुण वजा करण्यात येईल.

(४) प्रस्तुत संवर्गांच्या मुलाखतीस पात्र होण्याकरीता उमेदवारांना लघुलेखन-टंकलेखन चाचणीत एकुण ७५ गुणांपैकी किमान ३१ गुण मिळवणे आवश्यक राहील.

**४.** परीक्षेपूर्वी सरावासाठी श्रुतलेखनाचा परिच्छेद लघुलेखन-टंकलेखनासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**५.** प्रस्तुत लघुलेखन-टंकलेखन चाचणीसाठी सर्वसाधारण सुचना, चाचणीचा दिनांक व इतर तपशील स्वतंत्रपणे अवगत करण्यात येईल.

ठिकाण : नवी मुंबई

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग